(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

# भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

याचिकाकर्ता :

एम. सी. मेहता

वि.

उत्तरवादी :

तामिळनाडू राज्य आणि इतर

**न्यायनिर्णयाचा दिनांक : १०.१२.१९९६**

**न्यायमंच :**

कुलदीप सिंग, बी. एल. हंसारिया, एस. बी. मजुमदार

अधिनियम :

प्रमुख नोंदी :

न्यायनिर्णय :

**न्यायनिर्णय : हंसारिया, न्या.**

"मी  बालक आहे.

संपूर्ण जग माझ्या आगमनाची प्रतीक्षा करते.

मी काय बनणार हे सर्व विश्व कुतुहलाने पाहते. सामाजिक सुधारणा अजूनही अनिश्चित स्थितीत  आहेत.

मी जे काही आहे, ते उद्याचे जग असेल.

मी बालक आहे.

माझे प्रारब्ध तुमच्या हातात आहे.

मी यशस्वी होईन की अयशस्वी हे मोठ्या प्रमाणात तुम्ही निश्चित करता. मी प्रार्थना करतो की, आनंद देणाऱ्या गोष्टी मला दया. मी विनंती करतो की, मी जगासाठी आशीर्वाद ठरेन अशा प्रकारे मला प्रशिक्षित करा."

मॅनी जीन कोल

उपरोक्त अपील दाखल होण्यामागे 'बालक हा मनुष्याचा पिता असतो'  हे वचन असावे. पराक्रमी आणि चैतन्यशील माणसाने  वडील म्हणून समर्थ होण्यासाठी, मुलाचे

त्याच्या आयुष्याच्या संस्कारक्षम वयात चांगल्या प्रकारे संगोपन केले पाहिजे. त्याला शिक्षण मिळाले पाहिजे, त्याला मनुष्यप्राण्याबद्दल आणि साधनसामग्रीबद्दल माहिती प्राप्त झाली पाहिजे आणि त्याला अशा वातावरणात वाढवले पाहिजे की, वयात आल्यानंतर तो ध्येयासक्त मनुष्य बनलेला आढळला पाहिजे, जो समाजासाठी महत्वाचा आहे.

२. आपल्या सुज्ञ आणि बुद्धिमान घटनाकर्त्यांना याची जाणीव होती की, जर देशातील मुलांचे पालनपोषण झाले नाही आणि त्यांना शिक्षण मिळाले नाही, तर त्यांच्या कल्पनेतील भारत प्रत्यक्षात येणार नाही. यासाठी, स्वतःच्या वैयक्तिक लाभासाठी विविध नफेखोर व्यक्तींकडून होणारे त्यांचे शोषण आधी दर्शाविणे आवश्यक होते. आपल्या राज्यघटनेच्या भाग चार मधील अनुच्छेद २४ च्या शोषणाविरुद्ध मूलभूत हक्क मधील दोन पैकी एका तरतुदीमध्ये ही गरज उघडपणे आढळते. घटनाकर्त्यांना या बाबीची जाणीव होती की, जोवर मुलांना किमान मूलभूत शिक्षण मिळत नाही, तोवर या एकमेव प्रतिबंधामुळे मुलाला देश बांधणीच्या कार्यात त्याच्या लहान हिश्श्याचे योगदान देण्याची परवानगी मिळणार नाही. म्हणून आपल्या सर्वोच्च लेखामध्ये अनुच्छेद ४५ समाविष्ट करण्यात आले, ज्याद्वारे मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करण्यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी राज्यावर सोपविण्यात आली आहे. (हे ज्ञात आहे की, उन्नी कृष्णन, १९९३ - १ एससीसी ६४५ या प्रकरणातील या न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयानंतर आपल्या राज्यघटनेतील भाग पाच मधील या तरतुदीस मूलभूत अधिकाराचा दर्जा प्राप्त झाला.) मुलाचा विकास निरामय

पद्धतीने होण्यासाठी त्यास संधी आणि सुविधा दिल्या पाहिजेत अशा इच्छेच्या काही इतर तरतुदी देखील आपल्या राज्यघटनेमध्ये आहेत, ज्याचा आम्ही नंतर उल्लेख करू.

३. वरील गोष्टी असूनही, इतर अनेकांप्रमाणेच आपल्या देशातही मुलांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते, हे कठोर वास्तव आहे. बालमजुरी ही एक मोठी समस्या आहे आणि आपण स्वतंत्र होऊन ५० वर्षे उलटल्यानंतरही, विविध व्यवसाय आणि उद्योगधंदयांमध्ये बाल मजुरीस प्रतिबंध करणारे विविध कायदे केल्यानंतरसुद्धा, ज्याचा आपण नंतर तपशीलवार उल्लेख करू, ही समस्या निराकरण करण्यायोग्य राहिलेली नाही.

३ अ. बाल मजुरीच्या प्रतिबंधाचे उल्लंघन करण्याच्या प्रकरणात आपल्या देशात शिवकाशी हे सर्वांत वाईट पद्धतीचे उल्लंघन मानले गेले. जेव्हा तेथील परिस्थिती असह्य झाली, तेव्हा जनतेचे धडाडीचे वकील श्री. एम. सी. मेहता यांना या न्यायालयास अनुच्छेद ३२ अंतर्गत असलेल्या अधिकारास आवाहन करणे आवश्यक वाटले, कारण शेवटी अनुच्छेद २४ द्वारे हमी दिलेल्या मुलांच्या मूलभूत अधिकाराचे घोर उल्लंघन केले जात होते. सबब त्यांनी ही याचिका दाखल केली. दिनांक ३१ डिसेंबर, १९८५ रोजी शिवकाशीमध्ये २७,३३८ कामगारांना रोजगार देणारे २२१ नोंदणीकृत आगपेटीचे कारखाने होते, ज्यापैकी २९४१ मुले होती, असे नोंदवून, ती दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९० रोजीच्या आदेशाद्वारे ती याचिका एकदा निकाली काढण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयाने असे मत नोंदविले की, आगपेटी आणि फटाके

यांची निर्मिती प्रक्रिया (ज्याच्या निर्मितीसाठीसुद्धा शिवकाशी हे एक पारंपारिक केंद्र आहे) धोकादायक आहे, ज्यामुळे प्राणघातक प्रकरणांसह अपघात होतात. म्हणून, राज्यघटनेच्या अनुच्छेद ३९ (च) आणि ४५ मधील तरतुदी लक्षात घेऊन, कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या जीवनमानाचा दर्जा कसा सुधारता येईल याबाबत न्यायालयाने काही निर्देश दिले. दिलेल्या निर्देशांवर देखरेख ठेवण्यासाठी समिती स्थापन करण्याची गरजही न्यायालयाने व्यक्त केली.

४. त्यानंतर, शिवकाशीच्या एका फटाका कारखान्यात झालेल्या "दुर्दैवी अपघाताची" बातमी प्रकाशित झाल्यानंतर सध्याच्या प्रकरणातच स्वाधिकारे (स्वतःहून) दखल घेण्यात आली. न्यायालयाच्या निर्देशानुसार, तामिळनाडू सरकारने उत्तरादाखल एक तपशीलवार प्रतिज्ञापत्र दाखल केले, ज्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच, मृत्यू पावलेल्या लोकांची संख्या ३९ असल्याचे नमूद करण्यात आले होते. न्यायालयाने नुकसानभरपाई देण्याबाबत काही निर्देश दिले आणि दिनांक १४ ऑगस्ट, १९९१ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे, वकिलांच्या समितीने या भागाला भेट द्यावी आणि या प्रकरणाच्या विविध पैलूंशी संबंधित सर्वसमावेशक अहवाल तयार करावा, असा विचार केला. या समितीमध्ये (१) श्री. आर. के. जैन, वरिष्ठ वकील; (२) श्रीमती इंदिरा जयसिंग, अन्य वरिष्ठ वकील; आणि (३) श्री. के. सी. दुआ, वकील यांचा समावेश होता.

५. समितीने कौतुकास्पद काम केले आहे. तिने दिनांक ११.११.९१ रोजी अनेक शिफारशी असलेला आपला अहवाल सादर केला केला, ज्याचा सारांश अहवालाच्या पृष्ठ क्र. २४-२५ वर आढळतो आणि तो खालीलप्रमाणे आहे :-

(अ) फटाक्यांच्या कारखान्यांमध्ये मुलांना कामावर ठेवले जाणार नाही, याची खातरजमा करण्याचे निर्देश तामिळनाडू राज्याला देण्यात यावेत.

(आ) आगपेट्यांच्या कारखान्यांमध्ये पॅकिंगचे काम करणाऱ्या मुलांनी पॅकिंगसाठी असलेल्या स्वतंत्र जागेत काम केले पाहिजे.

(इ) नियोक्त्यांना, दिवसातून सहा तासांपेक्षा जास्त वेळ मुलांकडून काम करून घेण्याची परवानगी दिली जाऊ नये.

(ई) मुलांना त्यांच्या घरापासून ते त्यांच्या कामाच्या ठिकाणी आणि तेथून परत येण्यासाठी प्रवास करण्यासाठी नियोक्ते आणि राज्य सरकार यांनी योग्य वाहतूक सुविधा पुरवाव्यात.

(उ) करमणूक, सामाजिकीकरण आणि शिक्षणाच्या सुविधा कारखान्यात किंवा कारखान्याजवळ उपलब्ध करून दिल्या जाव्यात.

(ऊ) नियोक्त्यांनी मुलांना मूलभूत आहार पुरविण्याची व्यवस्था करावी आणि जर ते तसे करण्यात अयशस्वी ठरले तर सरकारला मूलभूत आहाराची तरतूद करण्यासाठी निर्देश दिले जाऊ शकतील -

तामिळनाडू सरकारचा शालेय मुलांसाठी असलेला दिवसातून एक जेवण हा कार्यक्रम बाल कामगारांपर्यंत विस्तारता येईल.

(ए) वस्तूंच्या संख्येच्या प्रमाणात देण्यात येणाऱ्या मोबदल्याच्या प्रथेचे उच्चाटन करून मासिक आधारावर रक्कम देण्यात यावी. मुलांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात मोबदला देण्यात यावा.

(ऐ) या उद्योगात काम करणाऱ्या सर्व कामगारांना, मग ते नोंदणीकृत कारखान्यांमध्ये काम करीत असोत किंवा नोंदणीकृत नसलेल्या कारखान्यांमध्ये काम करीत असोत, किंवा कुटीरोद्योगात किंवा कंत्राटी तत्वावर काम करीत असोत, विमा योजनेखाली आणणे आवश्यक आहे.

(ओ) कल्याण निधी - शिवकाशी क्षेत्रासाठी, सध्याच्या समितीऐवजी, एका समितीचे अध्यक्षपद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश किंवा समान दर्जाच्या व्यक्तीने भूषवावे आणि त्यात दोन सामाजिक कार्यकर्ते असावेत आणि ती समिती या मा. न्यायालयाला किंवा या मा. न्यायालयाने निर्देशित केलेल्या उच्च न्यायालयाला जबाबदार असावी. नियोक्त्यांना कल्याण निधीसाठी प्रति कामगार दरमहा रु. २/- जमा करण्याचे निर्देश देण्यात यावेत आणि राज्याला समान योगदान देण्याचे निर्देश देण्यात यावेत. सर्व उद्योगांच्या मालकांनी, मग ते

नोंदणीकृत उद्योग असोत किंवा नोंदणी न केलेले उद्योग असोत, अथवा कुटीरोद्योग असोत किंवा कंत्राटी तत्वावर असोत, प्रति कामगार दरमहा रु.२/- जमा करावेत.

(औ) बालमजुरी निर्मूलनासाठी टप्प्याटप्प्याने योजना तयार करण्यासाठी राष्ट्रीय बाल कल्याण आयोगाची स्थापना केली जावी. अशी समिती थेट या मा. न्यायालयास उत्तरदायी असावी आणि तिने नियमित कालावधीनंतर प्रगतीबाबत या मा. न्यायालयाला अहवाल दयावा.

६. समितीने केलेल्या प्रशंसनीय कार्याबद्दल आम्ही आमची प्रशंसा अभिलेखावर नोंदवितो.

७. अध्यक्ष, ऑल इंडिया चेंबर ऑफ मॅच इंडस्ट्रीज, शिवकाशी यांचे शपथपत्र अभिलेखावर आहे, ज्यात समितीच्या शिफारशींवरील त्यांची प्रतिक्रिया नमूद करण्यात आली आहे. हे शपथपत्र विचारात घेणे आवश्यक नाही. अध्यक्ष, तामीळनाडू फायरवर्क्स अँड अमोर्सेस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन यांनीदेखील समितीच्या शिफारशींवर आक्षेप दाखल केला होता. हे शपथपत्र डावलण्याचासुद्धा आमचा मानस नाही. या दोन्हींमध्ये सर्वसाधारण विधाने आहेत आणि समितीला ज्या बाबी आढळल्या त्या नाकारण्याचा समावेश आहे.

८. परिपूर्णतेसाठी असे म्हणता येईल की, शिवकाशी येथील बाल मजुरांच्या कामाच्या स्थिती इ. संदर्भात अनेक अहवाल अभिलेखावर आहेत. यापैकी पहिला अहवाल तामिळनाडू सरकारच्या कामगार विभागाने त्यांच्या दिनांक १९.०३.३४ रोजीच्या जिओ एमएस द्वारे थिरु एन. हरिभास्कर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या एक समितीचा आहे. समितीचा अहवाल विस्तृत आहे, कारण तो १८१ पानांचा आहे आणि त्यात अनेक जोडपत्रे आहेत. समितीने कामाच्या ठिकाणी असलेल्या परिस्थितीचा आणि बालमजुरीचे त्रास कमी करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला आणि आपल्या अहवालाच्या अकराव्या प्रकरणात विविध शिफारशी केल्या आहेत. आमच्याकडे 'शिवकाशी परिसरातील आगपेट्यांच्या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या महिला आणि मुलांचे राहणीमान सुधारण्यासाठी एकात्मिक प्रकल्प' या शीर्षकाचे कामराजार जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांचे काम देखील आहे. हे काम माहे, ऑक्टोबर १९८५ चे आहे. डॉन अमोर्सेस फायरवर्क्स इंडस्ट्रीज येथे दिनांक १२.०७.९१ रोजी झालेल्या आगीच्या स्फोटांची कारणे आणि परिस्थिती हाताळणारा आणखी एक अहवाल आहे आणि त्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना आहेत. शिवकाशी कामगारांशी संबंधित अंतिम अहवाल हा दिनांक ३० मार्च, १९९३ रोजीचा आहे, जो तामिळनाडूमधील आगपेटी आणि फटाके उद्योगातील बालमजुरी निर्मूलनाशी संबंधित आहे. कामगार आणि रोजगार, समाजकल्याण आणि शिक्षण विभागाच्या प्रतिनिधींनी युनिसेफच्या सहकार्याने हा अहवाल तयार केला होता आणि त्यात 'एक प्रस्तावित धोरण आराखडा' आहे.

९. भारत सरकारदेखील विविध उद्योगांमधील बालमजुरीशी संबंधित विविध पैलूंबद्दल स्वतःहून माहिती घेत आहे. कामगार मंत्रालयाच्या दिनांक ६/७ फेब्रुवारी, १९७९ रोजीच्या ठरावाद्वारे श्री एम. एस. गुरुपदस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने दिनांक २९.१२.७९ रोजी आपला अहवाल सादर केला आणि पाचव्या प्रकरणात समाविष्ट असलेल्या विविध शिफारशी केल्या. कामगार मंत्रालयाने त्यानंतर आंतरराष्ट्रीय बाल वर्ष कार्यक्रमाचे पालन करण्याचा एक भाग म्हणून बालमजुरीच्या समस्येचे विभागीय सर्वेक्षण केले होते. (दिनांक २४.०६.८१ रोजीच्या ) अहवालात उद्योगांच्या विशिष्ट संघटित आणि असंघटित क्षेत्रांत केलेल्या सर्वेक्षणाबद्दल उल्लेख आहे. यात संघटित आणि असंघटित अशा दोन्ही क्षेत्रांतील बालमजुरीशी संबंधित रोजगार, वेतन आणि उत्पन्न, कामाची परिस्थिती आणि कल्याणकारी उपक्रम यांचा समावेश आहे. अहवालाच्या तिसऱ्या प्रकरणात निष्कर्ष आहेत आणि त्यांपैकी परिच्छेद ४.५ मध्ये जे नमूद केले आहे, ते लक्षात घेण्यासारखे आहे. ते खालीलप्रमाणे आहेत :-

> आत्यंतिक गरीबी, फायदेशीर रोजगाराच्या संधींचा अभाव आणि उत्पन्नातील खंडीतता आणि राहणीमानाचा निम्न स्तर ही बालमजुरीच्या व्यापक प्रसाराची मुख्य कारणे आहेत. एकूण बालमजुरीपैकी अतिसूक्ष्म भाग असलेल्या संघटित क्षेत्रातील बालमजुरी सिद्ध करणे

शक्य असले तरी, ही समस्या प्रामुख्याने असंघटित क्षेत्राशी संबंधित आहे, जिथे सर्वाधिक लक्ष देणे आवश्यक आहे. ही समस्या सार्वत्रिक आहे, परंतु आपल्या बाबतीत ती अधिक महत्त्वाची आहे.

## समस्येची व्याप्ती.

१०. बालमजुरांना कामावर ठेवणारे शिवकाशी हे एकमेव केंद्र राहिलेले नाही. ही गंभीर समस्या आता त्या जागेपुरती मर्यादित राहिलेली नाही.

११. इंडियन एक्स्प्रेसच्या दिनांक २५.१०.१९९६ रोजीच्या एका लेखात भावनगरचे वर्णन आणखी एक शिवकाशी म्हणून करण्यात आले आहे, कारण सुमारे ४ लाख लोकसंख्या असलेल्या या शहरात ३०० विविध उद्योगांमध्ये किमान १३,००० मुले काम करतात. भारतातील बालमजुरीची समस्या खरोखरच दूरवर आणि मोठ्या प्रमाणात पसरली आहे. 'बॉर्न टू वर्क : चाइल्ड लेबर इन इंडिया' या शीर्षकाखाली प्रकाशित झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या स्वयंसेविका नीरा बुर्रा या सामाजिक मानववंशशास्त्रज्ञाच्या प्रशंसनीय कार्यातील पुस्तकात पृष्ठ क्र. XXII ते XXIV वर आढळणाऱ्या तक्त्यावरून हे स्पष्ट होईल. त्या तक्त्याचा उतारा उपयुक्त आहे आणि तो खालीलप्रमाणे आहे :-

| उद्योग | ठिकाण | एकूण कामगार | बाल कामगार | एकूण कामगारांच्या तुलनेत बाल कामगारांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| स्लेट पेन्सिल | मंदसौर, ,मध्य प्रदेश | १२,००० | १००० | ८.३ |
| स्लेट | मरकापुर, आंध्र प्रदेश | १५,००० | अंदाजे ३७५० | २५ |
| डायमंड-कटिंग | सुरत, गुजरात | १००,००० | १५,००० | १५ |
| ऐगट-कटिंग | कॅम्बे, गुजरात | ३०,००० | माहीत नाही | - |
| जेम पॉलिशिंग | जयपूर, राजस्थान | ६०,००० | १३,६०० | २२.६ |
| पॉवरलूम | भिवंडी, महाराष्ट्र | ३००,००० | १५,००० | ५ |
| सुती कपडे | तिरुपूर, तामिळनाडू | ३००,००० | ८,००० | ३३.३ |
| गालिचा विणणे | मिर्झापूर- भदोही, उत्तर प्रदेश | २००,००० | १,५०,००० | ७५ |
| गालिचा विणणे | जम्मू आणि काश्मीर | अंदाजे ४००,००० | १००,००० | २५ |
| गालिचा विणणे | राजस्थान | ३०,००० | १२००० | ४० |
| कुलूप बनवणे | अलीगढ, उत्तर प्रदेश | ८०,०००<br>९०,००० | ७,०००<br>१०,००० | ८.७<br>११.१ |
| कुंभारकाम | खुर्जा, उत्तर प्रदेश | २०,००० | ५,००० | २५ |
| पितळी भांडी | मुरादाबाद, उत्तर प्रदेश | १,५०,००० | ४०,०००<br>४५,००० | २६.६<br>३०.० |
| आगपेटी | शिवकाशी, तामिळनाडू | माहीत नाही | ४५,००० | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| काच | फिरोजाबाद, उत्तर प्रदेश | २००,००० | ५०,००० | २५ |
| रेशीम आणि रेशीम उत्पादने | वाराणसी, उत्तर प्रदेश | ११,९०० | ४,४०९ | ३७ |
| वस्त्रोद्योग | वाराणसी, उत्तर प्रदेश | ३,५१२ | १,१०८ | ३१.५ |
| चाकू | रामपूर, उत्तर प्रदेश | माहीत नाही | ३,००० | - |
| हस्तकला | जम्मू आणि काश्मीर | ९०,००० | २६,४७८ | २९.४२ |
| रेशीम विणणे | बिहार | माहीत नाही | १०,००० | - |
| ब्रोकेड आणि जरी उद्योग | वाराणसी आणि इतर केंद्रे, उत्तर प्रदेश | माहीत नाही | ३००,००० | - |
| वीटभट्टी | पश्चिम बंगाल | माहीत नाही | ३५,००० | - |
| विडी | भारत | ३,२७५,००० | ३,२७५,०० | १० |
| सर्कस उद्योग | ४० प्रमुख सर्कशी | | | संपूर्ण कामगार बळाच्या १२ % |
| हातमाग आणि हस्तकला उद्योग | जम्मू आणि काश्मीर | ११६,००० | २८,३४८ | २५ |

(स्त्रोत सामग्री वगळलेली आहे.)

११. सन १९७१ च्या जनगणनेनुसार भारतातील मुलांच्या संख्येमध्ये ४.६६ टक्के कामगार मुलांचा समावेश होता. पूर्ण संख्येत, सन १९७१ च्या जनगणनेनुसार कामगार मुलांची संख्या १०.७ दशलक्ष इतकी आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या २७ व्या फेरीच्या (सन १९७२-७३) आधारे, मार्च १९७३ पर्यंत, ५ ते १४ वर्षे वयोगटातील काम करणाऱ्या मुलांची संख्या १६.३ दशलक्ष असल्याचा अंदाज करता येईल आणि ३२ व्या फेरीच्या आधारे, दिनांक १ मार्च,

१९७८ रोजी ही संख्या १६.२५ दशलक्ष इतकी असेल (१४.६८ दशलक्ष ग्रामीण भागांत आणि १.५७ दशलक्ष शहरी भागांत). सन १९८१ च्या जनगणनेनुसार कामगार मुलांची ही संख्या ११.१६ दशलक्ष इतकी झाली आहे. नियोजन आयोगाच्या अंदाजानुसार, दिनांक १ मार्च, १९८३ रोजी १० ते १४ वर्षे वयोगटातील १५.७० दशलक्ष (१४.०३ ग्रामीण भागांत आणि १.६७ शहरी भागांत) बाल कामगार असतील आणि ५ ते १४ वर्षे वयोगटातील १७.३६ दशलक्ष बाल कामगार असतील. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेने सन १९८५ मध्ये ही संख्या १७.५८ दशलक्ष असल्याचा अंदाज वर्तवला आहे. यांपैकी कोणत्याही अधिकृत अंदाजांमध्ये असंघटित क्षेत्रातील बाल कामगारांचा समावेश नव्हता आणि त्यामुळे सदर अंदाजानुसार ते निश्चितच ढोबळमानाने कमी महत्वाचे अंदाज आहेत. काम करणाऱ्या मुलांची प्रत्यक्ष संख्या ४४ दशलक्ष ते १०० दशलक्ष या दरम्यान असल्याचा अंदाज विविध बिगर-सरकारी स्त्रोतांकडून वर्तवण्यात आला आहे.

(सन १९८१ च्या जनगणनेची आकडेवारी उद्धृत करण्यात आली आहे, कारण सन १९९१ च्या जनगणनेशी संबंधित अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही. असे सांगण्यात आले आहे की, तो प्रकाशनाच्या मार्गावर आहे).

१२. वरील लेख असे दर्शवितो की, बालमजुरीची तीव्रता जरी क्षेत्रानुसार वेगळी असली तरी, आतापर्यंत बालमजुरी ही अखिल भारतीय स्तरावर वाईट बाब आहे. त्यामुळे केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारे या दोहोंच्या एकत्रित प्रयत्नांशिवाय ही नामुष्की दूर

होणार नाही. सबब, ही याचिका सुरुवातीला ज्या ठिकाणाशी संबंधित होती, त्या शिवकाशीच्या मर्यादेपलीकडे जाणे योग्य आहे असे आम्हाला वाटले आहे. आमच्या मते, हा मुद्दा देशाच्या कोणत्याही एका प्रदेशाशी संबंधित नसून तो एक राष्ट्रीय मुद्दा म्हणून विस्तृत वर्णपट आणि व्यापक दृष्टीकोनातून हाताळणे अधिक योग्य ठरेल. त्यामुळे, एक उत्तम भारत घडवण्यासाठी ज्यावर तोडगा काढणे आवश्यक आहे, ती बालमजुरीची समस्या आपण कशी हाताळू शकतो आणि ती कशा प्रकारे हाताळणे आवश्यक आहे, याविषयी आपण स्वतःला पटवून देतो.

## संविधानाची मागणी

१३. उपरोक्त कार्य पूर्ण करण्यासाठी, आपल्याला प्रथम घटनात्मक आदेशाची नोंद घेणे आवश्यक आहे आणि पुढील अनुच्छेदांमध्ये समाविष्ट असलेल्या विषयाची आठवण करणे आवश्यक आहे :

> "**२४. कारखाने, इत्यादींमध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई -** चौदा वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोकादायक कामावर त्यास लावले जाणार नाही.
>
> ३९ (ङ) स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना

आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये ;

३९ (च) बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांना शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्याबाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे.

**४१. कामाचा, शिक्षणाचा आणि विवक्षित बाबतीत लोकसहाय्याचा हक्क. -** राज्य हे, आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडित अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत लोकसहाय्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करील.

**४५. मुलांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची तरतूद. -** या राज्यघटनेच्या प्रारंभापासून दहा वर्षांच्या कालावधीत राज्य, सर्व मुलांना त्यांच्या वयाची १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करेल.

**४७. पोषण व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य.** - आपल्या जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या गोष्टी राज्य आपल्या प्राथमिक कर्तव्यांपैकी असल्याचे मानील आणि विशेषतः मादक पेये व आरोग्यास अपायकारक अशी अंमली द्रव्ये यांचे औषधीय प्रयोजनाखेरीज सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. "

१४. उपरोक्त तरतुदींपैकी अनुच्छेद २४ मधील तरतूद ही दिनांक २८ जानेवारी, १९५० पासून मूलभूत अधिकार आहे. दिनांक ४ फेब्रुवारी, १९९३ रोजी निर्णय देण्यात आलेल्या उन्नी कृष्णन प्रकरणामध्ये सुद्धा अनुच्छेद ४५ ला सर्वोच्च महत्व देण्यात आले आहे. इतर कलमे जरी निदेशक तत्त्वांचा भाग असली तरी, आपल्या देशाच्या शासन व्यवहाराच्या दृष्टीने ती मूलभूत आहेत आणि ही तत्त्वे लागू करणे हे राज्याच्या सर्व अंगांचे (भागांचे) कर्तव्य आहे (अनुच्छेद ३७). न्यायव्यवस्था ही राज्याच्या तीन प्रमुख अंगांपैकी एक असल्यानेसुद्धा, सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या बाबींवर निर्णय घेताना न्यायव्यवस्थेला ही बाब लक्षात ठेवावी लागते. बालमजुरीचे उच्चाटन ही निश्चितच जनतेच्यादृष्टीने अत्यंत काळजीची आणि महत्त्वाची बाब आहे.

## आंतरराष्ट्रीय बांधिलकी

१५. जागतिक समुदायाप्रती असलेल्या आपल्या बांधिलकीबद्दलसुद्धा आम्ही स्वतःला अवगत करणे योग्य ठरेल. दिनांक २० नोव्हेंबर, १९८९ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने स्वीकारलेल्या बालहक्कांवरील कराराला भारताने मान्यता दिली आहे, हे लक्षात घेणे सध्याच्या प्रकरणासाठी पुरेसे ठरेल. मुलांच्या हक्कांना विशेष संरक्षणाची आवश्यकता आहे असे या कराराद्वारे सांगण्यात आले आहे आणि केवळ असे संरक्षण प्रदान करणेच नव्हे, तर संपूर्ण जगभरातील मुलांच्या स्थितीमध्ये सतत सुधारणा सुनिश्चित करणे, तसेच शांतता आणि सुरक्षिततेच्या स्थितीत त्यांचा विकास आणि शिक्षण सुनिश्चित करणे हे या कराराचे उद्दिष्ट आहे. अशा प्रकारे, हा करार केवळ मुलांच्या नागरी आणि राजकीय अधिकाराचे संरक्षण करत नाही, तर तो मुलांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवतावादी हक्कांच्या संरक्षणासाठी सुद्धा विस्तारित आहे.

१६. दिनांक ११ डिसेंबर, १९९२ रोजी भारत सरकारने संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांकडे वर नमूद केलेल्या करारात सामील होण्याचा आपला करारनामा सादर केला. त्या करारनाम्यामध्ये खालील घोषणापत्र समाविष्ट आहे -

> "या कराराची उद्दिष्टे आणि हेतू पूर्णपणे स्वीकारताना, उपलब्ध साधनसंपत्तीच्या मर्यादेच्या अधीन राहून आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या चौकटीत राहून, विकसनशील देशांमध्ये आर्थिक,

सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांशी संबंधित मुलांचे विशिष्ट अधिकार उत्तरोत्तरच अंमलात आणले जाऊ शकतात हे लक्षात घेऊन; आर्थिक शोषणासह सर्व प्रकारच्या शोषणांपासून मुलांचे संरक्षण करणे आवश्यक आहे हे जाणून ; भारतात वेगवेगळ्या वयोगटातील मुले विविध कारणांसाठी काम करतात याची नोंद घेऊन ; धोकादायक व्यवसायांमध्ये आणि इतर काही क्षेत्रांमध्ये रोजगारासाठी किमान वय निश्चित करणे; रोजगाराचे तास आणि अटींबाबत नियामक तरतुदी करणे; आणि भारतातील रोजगाराच्या प्रत्येक क्षेत्रात प्रवेशासाठी किमान वय विहित करणे तावडतोब व्यवहार्य नाही याची जाणीव ठेवून - भारत सरकार, आपल्या राष्ट्रीय विधिविधानाच्या आणि राज्याचा सहभाग असलेल्या संबंधित आंतरराष्ट्रीय करारांच्या अनुषंगाने, अनुच्छेद ३२ मधील, विशेषतः परिच्छेद २(क) मधील तरतुदी, उत्तरोत्तर अंमलात आणण्यासाठी उपाययोजना करण्याचे काम स्वीकारते."

१७. सामील होण्याच्या करारामधील नमूद केलेले अनुच्छेद २२ खालीलप्रमाणे आहे :

"१. आर्थिक शोषणापासून आणि धोकादायक किंवा मुलाच्या शिक्षणात अडथळा आणण्याची किंवा धोकादायक ठरण्याची किंवा मुलाच्या आरोग्यासाठी किंवा शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक,

नैतिक किंवा सामाजिक विकासासाठी हानिकारक ठरण्याची शक्यता असलेले कोणतेही काम करण्यापासून संरक्षण मिळण्याचा मुलाचा अधिकार सहभागी राज्ये मान्य करतात.

२. प्रस्तुत अनुच्छेदाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सहभागी राज्ये कायदेविषयक, प्रशासकीय, सामाजिक आणि शैक्षणिक उपाययोजना करतील. यासाठी आणि इतर आंतरराष्ट्रीय करारांतील संबंधित तरतुदींचा विचार करून, सहभागी राज्ये, विशेषतः-

(अ) नोकरीच्या प्रवेशासाठी किमान वय किंवा किमान वयोमर्यादेची तरतूद करतील.

(ब) रोजगाराच्या तासांचे आणि अटींचे योग्य नियमन करण्याची तरतूद करतील ;

(क) प्रस्तुत अनुच्छेदाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी योग्य दंड किंवा इतर शिक्षेची तरतूद करतील. "

## वैधानिक तरतुदी

१८. आपल्या धोरणकर्त्यांनी बालमजुरीच्या समस्येकडे कशा प्रकारे पहिले आहे आणि ही दुर्दैवी बाब हाताळण्यासाठी काय प्रयत्न केले गेले आहेत, याची आता आपण नोंद घेऊ शकतो. सन १९१९ मध्ये लीग ऑफ नेशन्स अंतर्गत स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय कामगार

संघटनेला असे वाटले की, ज्याद्वारे औद्योगिक उपक्रमांमधील एका विशिष्ट वयाखालील मुलांच्या रोजगाराचे नियमन करता येऊ शकतील अशी आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्वे असावीत आणि तेव्हापासून आम्ही या क्षेत्रात आमची चिंता व्यक्त केली आहे. म्हणून असे सुचविण्यात आले की कामाचे किमान वय १२ वर्षे असावे. त्यास भारतातील ब्रिटिश सरकारने मान्यता देणे आवश्यक होते ; आणि विधानसभेच्या चर्चेदरम्यान, किमान वय ९ वरून १२ वर्षांपर्यंत वाढविण्याच्या मुद्दयाने खळबळ माजली होती. माहे फेब्रुवारी १९२१ मध्ये मा. सर थॉमस हॉलंड यांनी विधानसभेत असे म्हटले होते की, जर किमान वय वाढवले गेले, तर त्यामुळे बहुतेक कापड गिरण्यांच्या, ज्यातील कर्मचारी प्रामुख्याने मुले होती, संघटनात्मक व्यवस्थेला धक्का बसेल. दुसरीकडे, असे काही लोक होते, ज्यांना असे वाटले की, या समस्येचे उत्तर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणात आहे. अखेरीस सभागृहामध्ये विभागणी होऊन ३२ सदस्यांनी किमान वय १२ पर्यंत वाढविण्याच्या बाजूने मतदान केले आणि ४० सदस्यांनी त्याच्या विरोधात मतदान केले. त्यामुळे, विधानसभेने गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिलला अशी शिफारस केली की, काही विशिष्ट निरीक्षणांसह मसुदा कराराला मान्यता देण्यात यावी.

१९. बालमजुरीचे हळूहळू उच्चाटन करण्याच्या प्रक्रियेमध्ये आणि औद्योगिक शोषणापासून मुलाचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कामगार संघटना महत्त्वाची भूमिका बजावत आहे हे नमूद करता येईल. तिने पाच मुख्य मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले आहेः -

१. बालमजुरीस प्रतिबंध.

२. कामाच्या ठिकाणी बालमजुरांचे संरक्षण करणे.

३. बालमजुरीच्या मूळ कारणांवर हल्ला करणे.

४. भविष्यातील काम करण्यात मुलांना मदत करणे.

५. काम करणाऱ्या पालकांच्या मुलांचे संरक्षण करणे.

जगभरातील काम करणाऱ्या मुलांच्या हितासाठी आय. एल. ओ. ने आतापर्यंत १८ करार आणि १६ शिफारशी स्वीकारल्या आहेत.

२०. येथे उचलण्यात आलेल्या पावलांचे कथन पुढे सुरू ठेवत, या देशातील कामगारांशी संबंधित विविध बाबींची चौकशी करण्यासाठी सन १९२९ मध्ये 'रॉयल कमिशन ऑन लेबरची' स्थापना करण्यात आली. या अहवालाला सन १९३१ मध्ये अंतिम रूप देण्यात आले. ज्या अन्याय आणि आणि धक्कादायक परिस्थितींत मुले काम करीत होती, अशा अनेक परिस्थिती या अहवालामुळे उघडकीस आल्या. आयोगाने विविध उद्योगांमधील बालमजुरीच्या स्थितीची तपासणी केली होती आणि त्यात असे आढळून आले होते की, मुलांना त्यांच्या मालकांच्या गरजेनुसार दररोज कितीही तास काम करण्यास भाग पाडले जात होते. त्यांना शारीरिक शिक्षा होत असल्याचेही आढळून आले. कमी रकमेच्या बदल्यात पालकांनी मुलांना नियोक्त्यांकडे सोपवण्याबद्दल आयोगाला अतिशय चिंता वाटली होती;

आणि ही पद्धत असमर्थनीय असल्याचे आढळून आल्याने, मुलाला (नियोक्त्याकडे) ठेवण्यात येण्याचे कोणतेही बंधपत्र रद्द मानले जावे अशी शिफारस आयोगाने केली होती.

२१. आयोगाच्या शिफारशींवर विधानसभेत चर्चा करण्यात आली आणि बाल (कामगारांचे ताबेगहाण) कायदा, १९३३ पारित करण्यात आला, जो बालमजुरीशी संबंधित पहिला वैधानिक कायदा असल्याचे म्हणता येईल. त्यानंतर अनेक कायदे पारित करण्यात आले.विविध व्यवसायांत बाल कामगारांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध करणारे खालील वैधानिक कायदे आज अंमलात आहेत :

(१) **कारखाना अधिनियम, १९४८ चे कलम ६७ :**

"अल्पवयीन बालकांना कामावर लावण्यास मनाई - ज्या बालकाला चौदावे वर्ष पूर्ण झालेले नाही अशा कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही."

(२) **मळे कामगार अधिनियम, १९५१ चे कलम २४ :**

"ज्या बालकाला बारा वर्षे पूर्ण झालेली नाहीत त्याला कोणत्याही मळ्यामध्ये काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही. "

(३) **व्यापारी जहाज वाहतूक अधिनियम, १९५१ चे कलम १०९ :**

"पंधरा वर्षांखालील कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही जहाजात कोणत्याही नात्याने काम करण्यासाठी कामावर ठेवले जाणार नाही किंवा समुद्रात नेले जाणार नाही, अपवाद -

(अ) विहित अटींनुसार शाळेच्या जहाजात किंवा प्रशिक्षण जहाजात; किंवा

(आ) ज्या जहाजात काम करणाऱ्या सर्व व्यक्ती एकाच कुटुंबातील सदस्य असतील ; किंवा

(इ) एकूण दोनशे टनांपेक्षा कमी असलेल्या घरगुती व्यापाराच्या जहाजात; किंवा

(ई) जेथे अशा व्यक्तीला नाममात्र वेतनावर नोकरीवर ठेवायचे असेल आणि तो त्याच्या वडिलांचा किंवा जवळचा पुरुष नातेवाईक असलेल्या अन्य सज्ञान व्यक्तीचा प्रभारी असेल."

(४) **खाण अधिनियम, १९५२ चे कलम ४५ :**

(क) "कोणत्याही मुलाला कोणत्याही खाणीत कामावर ठेवले जाणार नाही किंवा जमिनीखाली असलेल्या एखाद्या खाणीच्या कोणत्याही भागात किंवा भूपृष्ठावरील ज्या कोणत्याही भागात कोणतेही खाणकाम केले जात असेल, अशा कोणत्याही भागात कामावर लावता

येणार नाही.

(ख) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या संदर्भात नियुक्त करेल अशा तारखेनंतर, कोणत्याही मुलाला कोणत्याही खाणीच्या भूपृष्ठावरील कोणत्याही भागात खाणकामाशी निगडीत किंवा त्याला आनुषंगिक असे कोणतेही काम केले जात असेल अशा कोणत्याही भागात हजर राहण्यास मुभा दिली जाणार नाही. "

(५) **मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ चे कलम २१ :-**

"कोणत्याही बालकाला कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमामध्ये कोणत्याही नात्याने काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही."

(६) **शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ चे कलम ३ :-**

"शिकाऊ उमेदवार म्हणून ठेवून घेतले जाण्यासाठी अर्हता - एखादी व्यक्ती -

(क) ती चौदा वर्षांहून कमी वयाची नाही, आणि

(ख) विहित करण्यात येईल अशा दर्जाची शैक्षणिक पात्रता किंवा शारीरिक पात्रता तिच्याकडे आहे, असे असल्याशिवाय ती कोणत्याही निर्देशित उदीमामध्ये शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण घेण्यासाठी शिकाऊ उमेदवार म्हणून ठेवून घेतली जाण्यास अर्ह होणार नाही :

परंतु, वेगवेगळ्या निर्देशित उदीमांमधील शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाच्या संबंधात व वेगवेगळ्या शिकाऊ उमेदवार वर्गांकरिता वेगवेगळा दर्जा विहित करता येईल. "

(७) **विडी व सिगार कामगार (कामासंबंधीची परिस्थिती) अधिनियम, १९६६ चे कलम २४ :-**

"बालकांना कामावर ठेवण्यास मनाई - कोणत्याही बालकास कोणत्याही औद्योगिक वास्तूमध्ये काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही."

(८) **बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, १९८६. (सन १९८६ चा अधिनियम क्र. ६१).**

(९) **विविध राज्यांमधील वेगवेगळ्या नामांतर्गत दुकाने आणि व्यावसायिक आस्थापना अधिनियम.**

२२. बालमजुरीस प्रतिबंध करण्याची विधिमंडळाची तीव्र इच्छा असल्याचे उपरोक्त बाबीवरून दिसून येते. सकृतदर्शनी, सन १९८६ चा अधिनियम क्र. ६१ हे एक धाडसी पाऊल आहे. भाग तीन व्यतिरिक्त या अधिनियमाच्या तरतुदी एकाच वेळी अंमलात आल्या आणि भाग तीन अंमलात येण्यासाठी, केंद्र सरकारने कलम १ (३) द्वारे एक अधिसूचना दृष्टिपथात ठेवली, ज्याद्वारे भारतातील संपूर्ण प्रदेशांतील सर्व प्रकारच्या आस्थापनांचा समावेश

असलेली अधिसूचना दिनांक २६ मे, १९९३ रोजी जारी करण्यात आली होती.

२३. या कायद्याच्या कलम ३ अन्वये विवक्षित व्यवसायांत आणि प्रक्रियांत बालकांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग - क मध्ये, ज्यात कोणत्याही बालकाला कामावर लावता येणार नाही किंवा काम करण्याची परवानगी मिळणार नाही, अशा व्यवसायांची नावे नमूद करण्यात आली आहेत ; आणि भाग - ख मध्ये ज्या कोणत्याही कार्यशाळेत कोणत्याही बालकाला कामावर लावता येणार नाही किंवा काम करण्याची परवानगी मिळणार नाही, अशा कार्यशाळांची नावे नमूद करण्यात आली आहेत. अनुसूचीचे भाग 'क' आणि 'ख' उद्धृत करणे फायदेशीर ठरेल आणि ते खालीलप्रमाणे आहेत :

**भाग - क**

**व्यवसाय.**

खालील बाबींशी संबंधित व्यवसाय -

(१) प्रवासी, माल किंवा डाक यांची रेल्वेने वाहतूक ;

(२) रेल्वेच्या आवारात कोळसागाळ गोळा करण्याचे, राखेची खळी उपसण्याचे किंवा बांधकाम विषयक काम ;

(३) रेल्वे स्थानकावरील खान-पान सेवेतील विक्रेत्याला वा त्या सेवेतील अन्य कोणत्याही कर्मचाऱ्याला ज्या कामांकरिता एक फलाटावरून दुसऱ्या फलाटावर जावे लागते किंवा

चालत्या गाडीत चढावे वा उतरावे लागते ती कामे ;

(४) रेल्वे स्थानकाच्या बांधकामसंबंधीच्या कामाशी निगडीत असलेले किंवा जे काम रेल्वे रुळांच्या अगदी जवळ किंवा रुळांच्या मध्ये करावयाचे असते अशा कामाशी निगडीत असलेले काम ;

(५) कोणत्याही बंदराच्या हद्दीतील एखादे बंदर प्राधिकरण.

**भाग - ख**

**प्रक्रिया**

(१) विडया वळणे.

(२) गालिचे विणणे.

(३) सिमेंट निर्मिती, सिमेंट पोत्यात भरण्याच्या कामासह.

(४) कापडावर छपाई, ते रंगवणे व विणणे.

(५) आगपेट्या, स्फोटक द्रव्ये व फटाके यांची निर्मिती.

(६) अभ्रक कापणे व त्याचे तुकडे करणे.

(७) लाखेची निर्मिती.

(८) साबण निर्मिती.

(९) कातडी कमावणे.

(१०) लोकर साफ करणे.

(११) इमारत व बांधकाम उद्योग.

२४. अधिनियमाच्या  कलम १४ मध्ये अशी तरतूद आहे की, जो कोणी, कलम ३ च्या तरतुदींचे व्यतिक्रमण करून कोणत्याही बालकास नोकरीवर ठेवील किंवा काम करण्याची परवानगी देईल तो,   तीन महिन्यांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासास किंवा दहा हजर रुपयांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु बारा हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.   असे असले तरी,  सर्वसाधारण  अनुभव असा आहे की, बालमजुरांना कामावर ठेवणे सुरूच आहे. सन १९८६  चा अधिनियम असूनही असे का घडले याबद्दल नीरा बुर्रा यांनी त्यांच्या वर नमूद केलेल्या पुस्तकाच्या सन १९९५  च्या आवृत्तीतील पृष्ठ क्र. २३० ते २४६  वर  चर्चा केली आहे. सर्वप्रथम हे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, निरसित केलेल्या अधिनियमात (बालक सेवायोजन अधिनियम, १९३८) जे  व्यवसाय  आणि  प्रक्रिया नमूद करण्यात आल्या होत्या, त्याच या अधिनियमाद्वारे हाताळण्यात आलेल्या आहेत, अपवाद असा की, भाग - ख मध्ये एक प्रक्रिया समाविष्ट करण्यात आली आहे - ती म्हणजे "इमारत व बांधकाम उद्योग". नीरा यांच्या मते, अधिनियमात अनेक त्रुटी आहेत,  ज्यामुळे तो  "उद्योगात काम करणाऱ्या मुलांना काढून टाकण्याचे पूर्णपणे निष्प्रभावी साधन" बनला आहे. नमूद केलेल्या स्पष्ट त्रुटींपैकी एक म्हणजे मुले जर कामगार कुटुंबाचा भाग असतील तर ते काम करणे सुरू ठेवू शकतात. दर्शविलेल्या इतर दुर्बलता विचारात घेणे हे आपल्या उद्देशासाठी आवश्यक नाही. तथापि, या बाबीकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे की, या अधिनियमात कोठेही  'धोकादायक' हा शब्द वापरलेला नाही, ज्यामुळे  असे सूचित होते की, रसायनांचा समावेश नसलेल्या

प्रक्रियांमध्ये मुले काम करणे सुरू ठेवू शकतात. एखाद्या विशिष्ट उद्योगातील धोकादायक आणि धोकादायक नसलेल्या प्रक्रियांमध्ये फरक करणे किती अव्यवहार्य आणि अवास्तव आहे हे दर्शविण्याचा प्रयत्न नीरा यांनी केला आहे. असे सुचविण्यात आले की, संपूर्ण उद्योग हा बालमजुरीसाठी प्रतिबंधित म्हणून सूचीबद्ध करणे आवश्यक आहे, ज्यामुळे अंमलबजावणीचे काम सोपे होईल आणि टाळाटाळ करण्याचे डावपेच अधिक कठीण होतील.

## अपयश : कारणे

२५. म्हणून, उपरोक्त वैधानिक कायदे असूनही बालमजुरी का सुरू राहिली आहे हे आपल्याला बघावे लागेल. अनेक लेखकांचा हा अभ्यासाचा विषय झाला आहे. डॉ. जे. सी. कुलश्रेष्ठ यांनी 'भारतीय बालमजुरी' मध्ये दर्शविलेल्या बाबींची नोंद घेणे पुरेसे ठरेल. हा पैलू दुसऱ्या प्रकरणात हाताळण्यात आला आहे. लेखकाच्या मते, अपयशाची कारणे खालीलप्रमाणे आहेत : (१) गरीबी; (२) प्रौढांचे कमी वेतन; (३) बेरोजगारी; (४) कौटुंबिक भत्त्याच्या योजनांचा अभाव; (५) शहरी भागांत स्थलांतर; (६) मोठी कुटुंबे; (७) मुलांची सहज उपलब्धता ; (८) सक्तीच्या शिक्षणाच्या तरतुदीं अस्तित्वात नसणे; (९) निरक्षरता आणि पालकांचे अज्ञान; आणि (१०) पारंपरिक दृष्टीकोन. नझीर अहमद शाह यांनीही त्यांच्या 'भारतातील बाल मजुरी' या पुस्तकात अशाच प्रकारची मते व्यक्त केली आहेत. "भारतातील बालमजुरीच्या शोषणाची कारणे" या शीर्षकाच्या १९९३ (३) एस. सी. जे. (जर्नल विभाग) च्या पृष्ठ क्र. ६५ ते ६८ वरील लेखामध्ये हिमाचल प्रदेश विद्यापीठाशी संलग्न असलेल्या डॉ.

अमर सिंग आणि रघुविंदर सिंग यांनी हीच मते व्यक्त केली आहेत.

२६. आम्हांला असे वाटते की, वरील कारणांपैकी, गरीबी हे मूलभूत कारण आहे, ज्यामुळे, मुलाच्या पालकांना,अनिच्छा असूनही, त्याला नोकरी मिळवून देणे भाग पडते. कामगार मंत्रालयाच्या (उपरोल्लेखित) सर्वेक्षण अहवालातही तसे नमूद करण्यात आले होते. अन्यथा, कोणत्याही पालकांना, विशेषतः कोणत्याही आईला, हे आवडणार नाही की, एका कोवळ्या वयातील मुलाने, घरी आपल्या बालपणाचा आनंद पालकांच्या नजरेखाली मिळविण्याऐवजी, कारखान्यातील कठीण परिस्थितीत काम करावे.

**काय करावे?**

२७. सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरून ही समस्या काही प्रमाणात हाताळली जाईल असे असू शकते. खरे तर, नीरा यांना असे वाटते की, बालमजुरीची समस्या सोडविण्यासाठी जर काही आराखडा असलाच, तर तो शिक्षण हा आहे. जरी तसे असले तरी, जर मुलाला कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कमावणे अपरिहार्य असेल तर, गरीब पालकांच्या मुलाला शिक्षण मिळणार नाही. म्हणून , जोवर कुटुंबाला उत्पन्नाची खात्री दिली जात नाही तोवर बालमजुरीची समस्या क्वचितच सोडवता येईल; आणि हा महत्त्वाचा प्रश्न आहे ज्यावर जवळपास लक्ष दिले गेले नाही. परंतु, आमचे असे मत आहे की जोपर्यंत कुटुंबाला पर्यायी उत्पन्नाची हमी दिली जात नाही, तोपर्यंत बालमजुरी निर्मूलनाचा प्रश्न ही खरोखरच

अशक्यप्राय बाब असेल. आता, जोवर कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत काम करण्याची किंवा इतर धोकादायक कामांमध्ये गुंतलेले असण्याच्या मर्यादेसाठी जर त्या १४ वर्षांखालील मुलाचा रोजगार हा घटनात्मक संकेत आहे आणि जर हे पाहायचे असेल की, आता हा मूलभूत अधिकार असल्यामुळे, सर्व मुलांना वयाच्या १४ वर्षांपर्यंत शिक्षण दिले जाते आणि अनुच्छेद ३९ (ङ) मध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे बालकांच्या कोवळ्या वयाचा दुरुपयोग केला जाऊ नये आणि नागरिकांना त्यांच्या आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये आणि अनुच्छेद ३९ (च) मध्ये कल्पना केल्याप्रमाणे, जर बालकांना निरामय पद्धतीने आपला विकास करण्यासाठी संधी आणि सुविधा दिल्या आणि बालकांना शोषणापासून संरक्षण दिले, तर आम्हांला असे दिसते की, बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, १९८६ करण्यामागील वैधानिक मथितार्थ पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे इतकेच आपल्याला करावे लागेल. त्यातून मार्गदर्शन घेत, आमचे असे मत आहे की, उल्लंघन करणाऱ्या नियोक्त्याला, अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कामावर ठेवलेल्या प्रत्येक मुलासाठी रु. २०,०००/- इतक्या रकमेची नुकसानभरपाई देण्यास सांगितले पाहिजे ; आणि कलम १७ द्वारे अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी ज्या निरीक्षकांची नियुक्ती अभिप्रेत आहे, त्यांनी हे काम करावे. कलम १७ अन्वये नियुक्त केलेले निरीक्षक हे पाहतील की, अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कामावर ठेवलेल्या प्रत्येक मुलासाठी, संबंधित नियोक्ता रु.२०,०००/- इतकी रक्कम भरेल, जी बाल कामगार पुनर्वसन-आणि-कल्याण निधी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या

निधीमध्ये जमा केली जाऊ शकते. जरी सध्या नोकरी करत असलेल्या मुलाला कामावरून काढून टाकण्याची नियोक्त्याची इच्छा असली, तरी त्याचे दायित्व संपुष्टात येणार नाही. असा निधी जिल्हानिहाय किंवा क्षेत्रनिहाय असणे कदाचित योग्य ठरेल. अशा प्रकारे निर्माण झालेला निधी राखीव निधी असेल, ज्याचे उत्पन्न हे केवळ संबंधित बालकासाठी वापरण्यात येईल. मुलाच्या नावे जमा केलेल्या राखीव निधीतून मिळणारे उत्पन्न हे परिमाण असू शकते. अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी हा निधी कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या किंवा इतर सार्वजनिक संस्थेच्या जास्त उत्पन्न देणाऱ्या योजनेमध्ये जमा केला जाऊ शकतो.

२८. मुलांच्या रोजगारासाठी प्रयत्न करणाऱ्या आईवडीलांना /पालकांना परावृत्त करण्यासाठी उपरोक्त उत्पन्न पुरेसे असू शकत नसल्यामुळे, या संदर्भात आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी पुढे येणे हे राज्याचे कर्तव्य आहे. शेवटी, उपरोक्त घटनात्मक तरतुदींची अंमलबजावणी समुचित शासनाने करावयाची आहे आणि त्या शब्दाची व्याख्या अधिनियमाच्या कलम २ (एक) मध्ये करण्यात आली आहे, ज्याचा अर्थ केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालील कोणतीही आस्थापना किंवा रेल्वे प्रशासन किंवा मोठे बंदर किंवा खाण किंवा तेल क्षेत्र यांच्या बाबतीत केंद्र सरकार आणि इतर सर्व प्रकरणी राज्य शासन, असा आहे.

२९. आता, काटेकोरपणे सांगायचे तर, कामाच्या हक्कासंदर्भात राज्यघटनेच्या अनुच्छेद ४१

चा वापर करण्यासाठी आणि जनतेचे राहणीमान उंचावण्यासंदर्भात अनुच्छेद ४७ मध्ये केलेली तरतूद अंमलात आणण्यासाठी आणि अनुच्छेद ३९ (ङ ) आणि (च) अन्वये बालकांच्या कोवळ्या वयाचा दुरुपयोग न करण्यासाठी आणि त्यांना निरामय पद्धतीने विकासासाठी संधी व सुविधा देण्यासाठी, ज्याचे मूल कारखान्यात किंवा खाणीत किंवा इतर धोकादायक कामात कार्यरत आहे, त्या कुटुंबातील सज्ञान सदस्याला मुलाच्या बदल्यात कुठेही नोकरी मिळते हे पाहण्यास राज्याला सांगण्यासाठी एक भक्कम आधार अस्तित्वात आहे. यामुळे, उन्नीकृष्णनमधील निर्णयाद्वारे मूलभूत अधिकाराचा दर्जा दिलेल्या अनुच्छेद ४५ द्वारे अभिप्रेत असलेल्या प्राथमिक शिक्षणाप्रमाणे, सर्वोच्च लेखात नमूद केल्यापासून जवळपास अर्ध्या शतकानंतर, कलम ४१ मध्ये समाविष्ट असलेल्या इच्छेची पूर्तता होत असल्याचेसुद्धा दिसून येईल. परंतु, या टप्प्यावर आम्ही राज्यास अनुच्छेद २४ मध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक प्रकरणात पर्यायी रोजगाराची सुनिश्चिती करण्यास सांगत नाही, कारण कलम ४१ मध्ये "राज्याची आर्थिक क्षमता आणि विकास यांच्या मर्यादेत" कामाच्या हक्काबाबत तरतूद आहे. जर आम्ही समुचित शासनाला प्रत्येक प्रकरणात पर्यायी रोजगाराचे आश्वासन देण्यास सांगितले तर उपरोक्त व्यवसायांमधील बाल मजुरांच्या मोठ्या संख्येसाठी मोठ्या प्रमाणात प्रौढांना नोकरी देणे आवश्यक होईल आणि जर एखाद्या सज्ञान व्यक्तीस खाजगी क्षेत्रातील आस्थापनेत किंवा त्या बाबतीत सरकारी क्षेत्रातील संस्थेत नोकरी देणे शासनास शक्य झाले नसते तर राज्याच्या साधनसंपत्तीवर ताण आला असता. <? ?>, तसे करण्यासाठी आम्ही सध्या कोणतेही निर्देश देत नाही आहोत. त्याऐवजी, आम्ही हे प्रकरण

समुचित शासनाद्वारे सोडविण्यासाठी ठेवतो. ज्या प्रकरणांमध्ये वर नमूद केल्याप्रमाणे नोकरी देणे शक्य होणार नाही, अशा प्रकरणांमध्ये समुचित शासन, कारखान्यात किंवा खाणीत किंवा इतर कोणत्याही धोकादायक नोकरीत काम करणाऱ्या प्रत्येक मुलासाठी आपले योगदान/अनुदान म्हणून, उपरोक्त निधीमध्ये रु. ५,०००/- इतकी रक्कम जमा करेल.

३०. उपरोक्त (शासन) एकतर मुलाच्या बदल्यात एखाद्या सज्ञान व्यक्तीला (ज्याचे नाव संबंधित मुलाचे आईवडील /पालक सुचवतील) नोकरी देण्यात येईल हे पाहील किंवा बाल कामगार पुनर्वसन-आणि- कल्याण निधीमध्ये रु.२५,०००/- इतकी रक्कम जमा करेल. एखाद्या सज्ञान व्यक्तीसाठी रोजगार मिळण्याच्या बाबतीत, आईवडिलांना/ पालकांना हे पाहावे लागेल की, त्याच्या मुलाला नोकरी करण्याची गरज राहणार नाही, कारण त्यांना उत्पन्नाचा पर्यायी स्रोत उपलब्ध झाला असेल.

३१. उपरोक्त निर्देशांना मूर्तरुप देण्यासाठी, संबंधित राज्यांनी खालील गोष्टी करणे आवश्यक आहे असे आम्हांस वाटते :-

(१) वरील प्रकारच्या बालमजुरीचे सर्वेक्षण केले जाईल, जे आजपासून सहा महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केले जाईल.

(२) प्रारंभी, रोजगाराच्या कोणत्या धोकादायक बाबी निकष म्हणून मानल्या जातील हे ठरविण्यासाठी, अनुच्छेद २४ मध्ये नमूद केलेल्या रोजगाराच्या संदर्भात, ज्याला मुख्य क्षेत्र

मानले जाऊ शकते, काम हाती घेतले जाऊ शकते. सर्वांत धोकादायक रोजगार प्राधान्यक्रमात प्रथम असू शकतो आणि त्यानंतर तुलनेने कमी धोकादायक रोजगार असू शकतात. येथे नमूद केले जाऊ शकते की भारत सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय बालमजुरी धोरणात प्राधान्याने कारवाई करण्यासाठी काही उद्योग याआधीच निश्चित करण्यात आले आहेत आणि निश्चित केलेले उद्योग खालीलप्रमाणे आहेत :-

शिवकाशी, तामिळनाडू येथील आगपेटी उद्योग

सुरत, गुजरात येथील हिरा पॉलिशिंग उद्योग.

जयपूर, राजस्थान येथील मौल्यवान खडे पॉलिशिंग उद्योग.

फिरोझाबाद, उत्तर प्रदेश येथील काच उद्योग.

मिर्झापूर - भदोही, उत्तर प्रदेश येथील पितळी भांडी उद्योग.

अलीगढ, उत्तर प्रदेश येथील कुलूप बनवण्याचा उद्योग.

मरकापूर, आंध्र प्रदेश येथील स्लेट उद्योग.

मंदसौर, मध्य प्रदेश येथील स्लेट उद्योग.

(३) आमच्या निर्देशानुसार दिली जाणारी नोकरी इतर खात्रीशीर रोजगाराशी जुळती असू शकते. हे केले जात असताना, हे स्पष्ट आहे की आमच्या निर्देशांसाठी जास्त अतिरिक्त रोजगार निर्मितीची आवश्यकता नसेल.

(४) अशा प्रकारे दिला जाणारा रोजगार हा, ज्या उद्योगात मूल कार्यरत आहे, तो उद्योग असू शकतो, सार्वजनिक उपक्रम देखील असू शकतो आणि ज्याप्रकारे संबंधित मूल हाताने करण्याजोगे काम करण्यात गुंतलेले असेल, तसे ते हाताने करण्याजोगे काम असेल. रोजगाराकरिता निवडलेला उपक्रम हा कुटुंबाच्या निवासस्थानाच्या सर्वांत जवळ असेल.

(५) ज्या प्रकरणांमध्ये उपरोक्तप्रमाणे पर्यायी रोजगार उपलब्ध करून दिला जाणार नाही, त्या प्रकरणांमध्ये संबंधित मुलाच्या आईवडिलांना /पालकांना राखीव निधीवर मिळणारे उत्पन्न दिले जाईल, जे प्रत्येक मुलासाठी दरमहा रु.८५,०००/- इतके असेल. जर आईवडिलांनी /पालकांनी मुलाला शिक्षणासाठी पाठविले नाही, तर दिलेली नोकरी किंवा दिलेली रक्कम कार्यान्वित होणार नाही.

(६) मुलाचा रोजगार बंद झाल्यावर, त्याला एक चांगला नागरिक बनवण्याच्या दृष्टीने योग्य संस्थेत त्याचे शिक्षण सुनिश्चित केले जाईल. हे दर्शविता येईल की, अनुच्छेद ४५ अन्वये सर्व मुलांना त्यांच्या वयाची १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत सक्तीचे शिक्षण अनिवार्य आहे ; तसेच ते मोफत असणे देखील आवश्यक आहे. राज्यघटनेच्या या मागणीचे पालन होत आहे हे पाहणे निरीक्षकांचे कर्तव्य असेल.

(७) जिल्हा हे संकलनाचे मापन असू शकते, जेणेकरून जिल्ह्याचा कार्यकारी प्रमुख निरीक्षकांच्या कामावर लक्ष ठेवेल. तसेच, कामाची व्याप्ती लक्षात घेऊन, समुचित शासनाच्या कामगार विभागात एक स्वतंत्र कक्ष तयार केला जाईल. योजनेवर देखरेख करणेसुद्धा आवश्यक असेल आणि कदाचित विभागाचे सचिव हे काम करू शकतील. सर्वंकष देखरेख

कामगार मंत्रालय करेल. हे भारत सरकारसाठी फायदेशीर आणि उपयुक्त ठरेल.

(८) आजपासून एक वर्षाच्या आत, वरील निर्देशांच्या अनुपालनाबाबत भारत सरकारच्या कामगार मंत्रालयाचे सचिव न्यायालयास माहिती देतील. अनुपालनाच्या अहवालाच्या पार्श्वभूमीवर जर याचिकाकर्त्याला आणखी काही आदेशाची आवश्यकता असेल, तर तसे करण्याचा पर्याय त्याला खुला असेल.

(९) आम्ही असेही निरीक्षण नोंदवू इच्छितो की, दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी केल्यानंतर, अधिनियमाद्वारे प्रतिबंधित केलेली बालमजुरास कामावर ठेवण्याची बाब जेथे आढळेल, त्या प्रकरणी वर नमूद केलेल्या सन १९३६ च्या अधिनियमात समाविष्ट असलेल्या दंडात्मक तरतुदींचा वापर करण्यात येईल.

(१०) जेथे धोकादायक नसलेल्या नोकऱ्यांचा संबंध आहे, तेथे मुलाच्या कामाचे तास दिवसाला चार ते सहा तासांपेक्षा जास्त नाहीत आणि त्याला प्रत्येक दिवशी किमान दोन तास शिक्षण मिळते याची तपासणी निरीक्षकाला करावी लागेल. हे देखील पाहिले जाईल की, शिक्षणाचा संपूर्ण खर्च नियोक्त्याकडून केला जात आहे.

३२. हे काम मोठे आहे, परंतु ते आवाक्यात नसलेले किंवा तापदायक ठरेल असे नाही. आर्थिक परिणाम असे असतील की ते नुकसानकारक सिद्ध होतील, कारण शेवटी या पैशाचा वापर चांगल्या भारताच्या उभारणीसाठी केला जाईल. या संदर्भात, हे दर्शाविणे योग्य आहे की, बालमजुरांच्या समस्येची काळजी घेण्यात इतर विकसनशील देशांच्या मार्गात गुप्तता

आड आली नाही. मायरॉन वेनर यांनी त्यांच्या 'द चाइल्ड अँड द स्टेट इन इंडिया' या पुस्तकात (सन १९९१ च्या आवृत्तीच्या पृष्ठ क्र. ४ वर) असे निदर्शनास आणून दिले आहे की, कामगारांच्या गटातून मुलांना काढून टाकण्याच्या आणि सक्तीच्या, सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या स्थापनेच्या जागतिक प्रवृत्तीला भारत हा एक महत्त्वपूर्ण अपवाद आहे, कारण ज्यांच्या उत्पन्नाचा स्तर भारतापेक्षा कमी आहे, अशा झांबिया, घाना, आयव्हरी कोस्ट, लिबिया, झांबिया, झिम्बाब्वे यांसारख्या आफ्रिकेतील अनेक देशांनी, या प्रकरणांत अधिक चांगली कामगिरी केली आहे. यातून असे दिसून येते की, बालमजुरीची समस्या येथे कायम राहिली आहे, याचे कारण प्रत्यक्षात साधनसंपत्तीची कमतरता हे नाही, तर खऱ्या उर्जेचा अभाव हे आहे. हे असे सुरू न ठेवता, आपण सर्वांनी एकत्र येऊन योजना आखून प्रयत्न करूया आणि देशाच्या भल्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावरील हितासाठी बालकाला मदत करूया.

३३. त्यानुसार रिट याचिका निकाली काढण्यात आली आहे.

३४. विसाव्या शतकाच्या अखेरच्या वर्षांमध्ये ,आपल्या राज्यघटनेने सुमारे अर्ध्या शतकापूर्वी आपल्या बालकांना दिलेले वचन आपण पाळतअसल्याचे पाहता येईल, या उत्कट आशेसह आम्ही हा विषय संपवितो. , ज्याबद्दल आपल्या पारितोषिक विजेत्या कवी रवींद्रनाथ टागोर यांनी 'गीतांजली' मध्ये सांगितले आहे, त्या "स्वातंत्र्याच्या स्वर्गात" एकविसाव्या शतकातील बालकाला स्वतःला शोधू द्या.

३५. या न्यायनिर्णयाची एक प्रत सर्व राज्य सरकारांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पाठविण्यात यावी ; त्याचप्रमाणे भारत सरकारच्या कामगार मंत्रालयाच्या सचिवांनासुद्धा त्यांच्या माहितीसाठी आणि आवश्यक ती कृती करण्यासाठी पाठविण्यात यावी.

x-x-x-x

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x